|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव**
**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University,Jalgaon**
**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

दूरध्वनी क्र. : २२५७३२० ते ३२३
फॅक्स नं. : ०२५७-२२५८४०३/४०६
वेब साईट : www.nmu.ac.in

जा.क.कबचौउमवि/७-अ / 2449 /२०२० दिनांक : २३/०९/२०२०

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य /मान्यता प्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक
आणि विद्यापीठ प्रशाळा / विभागांचे मा.संचालक / मा.विभागप्रमुख यांना...

विषय: **शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या अंतिम वर्षाच्या / अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांच्या पूनर्परीक्षार्थीसह (Backlog) परीक्षां संदर्भात.....**

**संदर्भ :** १. मा.विद्या परिषद ठराव क्र. ए-०५/२०२०, दि. ०५.०९.२०२०
२. मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळ ठराव क्र. प.मू.मं.२६/२०२०, दि.०५.०९.२०२०
३. विद्यापीठ परिपत्रक क्र.२०१/२०२०, दि.१०.०९.२०२०

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठामार्फत माहे मार्च / एप्रिल / मे, २०२० मधील लेखी परीक्षा कोरोना (Covid-19) विषाणूचा प्रादुर्भाव व तद्अनुषंगाने झालेल्या टाळीबंदीमुळे स्थगीत करण्यात आल्या होत्या. सदर स्थगीत करण्यात आलेल्या विविध वर्गापैकी फक्त **अंतिम वर्षाच्या / अंतिम सत्राच्या पूनर्परीक्षार्थीसह (Backlog) विद्यार्थ्यांच्या परीक्षा ह्या मा.सर्वोच्च न्यायालय व शासनाच्या आदेशान्वये दि. ०१ ऑक्टोबर,२०२०** पासून Online व Offline पध्दतीने आयोजित करण्यात येत आहेत.

त्यानुसार वरील संदर्भीय क्र. ३ च्या परिपत्रकानुसार, परीक्षेचे माध्यम व स्वरुप (Mode of Examination and Pattern) बाबत खालीलप्रमाणे कळविण्यात आले आहे.

मा.विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्य केल्याप्रमाणे परीक्षचे स्वरुप वस्तुनिष्ठ स्वरुपात / बहुपर्याची Multiple Choice Question (MCQ) पध्दतीने पदवीस्तरावरील परीक्षांसाठी ६० गुणांची परीक्षा ही ९० मिनिटांची राहील, एकूण प्रश्न ६० असतील व प्रत्येक प्रश्नाला एक गुण राहील. तसेच पदव्युत्तरस्तरावरील परीक्षांसाठी ६० गुणांची परीक्षा ही १२० मिनिटांची राहील, एकूण प्रश्न ६० असतील व प्रत्येक प्रश्नाला एक गुण राहील, या परीक्षेकरीता Negative Marking पध्दत लागू राहणार नाही. तसेच सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य राहील, असे कळविण्यात आले होते.

तसेच बहिस्थ अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांची परीक्षा १०० गुणांची व १२० मिनिटांची राहील. एकूण प्रश्न ५० असतील व प्रत्येक प्रश्नाला दोन गुण राहतील. या परीक्षेकरीता Negative Marking पध्दत लागू राहणार नाही.

या संदर्भात विविध विद्यार्थी संघटनाकडून विद्यापीठास निवेदने प्राप्त झाले असून, सदरची निवेदने मा.कुलगुरु महोदय यांचे अवलोकनार्थ तथा आदेशार्थ सादर केले असता, मा.कुलगुरु महोदयांनी विद्यार्थी हित लक्षात घेता, प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्न सोडविण्याच्या नियमामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यास मान्यता दिली आहे.

१. **ज्या विषयाच्या वस्तुनिष्ठ / बहूपर्यायी प्रश्नपत्रिकेत ६० प्रश्न असतील त्यापैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही ४० प्रश्न सोडवावेत.**
२. **ज्या विषयाच्या वस्तुनिष्ठ / बहूपर्यायी प्रश्नपत्रिकेत ४० प्रश्न असतील त्यापैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही ३० प्रश्न सोडवावेत.**
३. **ज्या विषयाच्या वस्तुनिष्ठ / बहूपर्यायी प्रश्नपत्रिकेत ३० प्रश्न असतील त्यापैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही २० प्रश्न सोडवावेत.**
४. **DEEL विभागातील विद्यार्थ्यांनी ज्या विषयाच्या वस्तुनिष्ठ / बहूपर्यायी प्रश्नपत्रिकेत ५० प्रश्न असतील त्यापैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही ४० प्रश्न सोडवावेत.**
५. **MBA अंतर्गत Case Study असलेल्या विषयासाठी कोणतेही दोन Case Studies वरचे प्रश्न सोडवावेत.**
६. **वरीलप्रमाणे गुण निश्चित करतांना जर एखाद्या विद्यार्थ्याचे गुण अपूर्णाकांत येत असल्यास त्याचे रुपांतर दशांशाच्या पुढे ५० किंवा अधिक असल्यास पुढील पुर्णांकात व दशांशाच्या पुढे ५० पेक्षा कमी असल्यास मागील पूर्णांकात घ्यावे. उदा. ३९.४९ किंवा त्यापेक्षा कमी असेल तर ३९ घ्यावे व ३९.५० किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर ४० घ्यावे.**
७. **पुढील शैक्षणिक वर्षात आश्वासित प्रवेशाबाबत (Carry Forward) :**
   १. **संदर्भ क्र. २ मधील शिफारस क्र. अ-१ (i) अनुसार अंतिम वर्षाचे विद्यार्थी वगळता जर सर्व अभ्यासक्रमातील विषयांमध्ये अनुत्तीर्ण असलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षात / सत्रात प्रवेश घेण्यासाठी पात्र समजण्यात येतील.**
   २. **सदर सवलत ही केवळ शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठीच असेल.**

**याकरीता परीक्षेचा कालावधी पदवीस्तरावरील परीक्षांसाठी ९० मिनिटे व पदव्युत्तरस्तरावरील परीक्षांसाठी १२० मिनिटे इतकाच कालावधी राहील. यात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तसेच प्राप्त गुणांचे रुपांतर एकूण गुणांमध्ये करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

तेव्हा, वरीलप्रमाणे प्रश्नपत्रिकांच्या एकूण प्रश्न सोडविण्याच्या नियमामध्ये बदल झाले असून, सदर बदलाची नोंद घेवून संबंधित सर्व परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी व विद्यार्थ्यास कोणत्याही प्रकारची समस्या निर्माण होणार नाही याची पुरेपूर काळजी घेवून, परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(भ. प्र. पाटील)
**संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीसाठी :**
१. मा.कुलगुरु महोदय कार्यालय, कबचौउमवि,जळगाव
२. मा.प्र-कुलगुरु महोदय कार्यालय, कबचौउमवि,जळगाव